# जाहिरात

# इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी - टी.बी.
# ठाणे महानगरपालिका, ठाणे.

इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी-टी.बी. ठाणे महानगरपालिका, ठाणे राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाकरीता कंत्राटी तत्वावर खालीलप्रमाणे रिक्त पदे भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | संवर्ग | रिक्त पदे | सामाजिक आरक्षणानुसार भरावयाची पदे | दरमहा करार तत्वावरील वेतन | वयोमर्यादा | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ उपचार पर्यवेक्षक (STS) | ३ | २-खुला<br>१-इमाव | शासनाकडुन २००००/- + महापालिकेकडुन ९३७६= २९३७६/- प्रति महिना | ३८ वर्षापर्यंत (मागास प्रवर्गातील उमेदवाराला ४३ वर्षापर्यंत वयाची अट शिथील राहील) | Any graduate with Typing skill, Marathi - ३० words per minute , English ४० words per minute with MSCIT<br><br>१ Year Experiance. |
| २ | औषधनिर्माता | १ | खुला | १७०००/- + महापालिकेकडुन २५८४= १९५८४/- प्रति महिना | | B. Pharm / D.Pharm.<br>१ Year Experiance |

**अटी व शर्ती :-**

१. वरील प्रस्तावीत केलेली पदे ही एकत्रित वेतनावर भरण्यात येतील.

२. उमेदवाराने अर्ज A४ साईज पेपरवर लिहून त्यामध्ये खालील बाबींचा उल्लेख करावा.

अ. उमेदवाराने ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचा अर्जामध्ये स्पष्टपणे उल्लेख करावा.

ब. अर्जदाराचे संपूर्ण नाव, पत्रव्यावहाराचा पत्ता, दूरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक. व ईमेल आयडी.

क. जन्मतारीख (सोबत जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र जोडावे ).

ड. जात प्रमाणपत्र.

इ.शैक्षणिक अहर्ता प्रमाणपत्र.

ई. अनुभव दाखला.

उ. अर्जासोबत पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा.

ऊ. शासकीय / निमशासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांनी संबंधीत कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

वरील सर्व कागदपत्र विहीत मुदतीत सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील. तसेच विहीत मुदतीत कागदपत्रे सादर न केल्यास त्यानंतर सादर केलेली कागदपत्रे स्विकारली जाणार नाही. उमेदवारांच्या अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांनाच मुलाखतीकरीता बोलविण्यात येईल.

३. अर्जासोबत वरील सर्व प्रमाणपत्राच्या स्वंय साक्षांकित प्रती जोडण्यात याव्यात.

४. नेमणुकी संदर्भात सोसायटीने घेतलेले सर्व निर्णय अंतिम राहतील.

५. नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा कंत्राटी असल्यामुळे महापालिकेच्या अस्थापनेवर कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही.

Scanned with CamScan

६. जाहिरातीमध्ये प्रसिध्द केलेल्या पदांमध्ये अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संरचनेमध्ये वाढ किंवा घट तसेच निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उचित पध्दतीचा अवलंब करुन उमेदवाराची चाळणी करण्याचे सर्व अधिकार महापालिकेने राखून ठेवलेले आहेत. याबाबत उमेदवाराला कोणतीही तक्रार अथवा दावा सांगता येणार नाही.

७. एखाद्या अर्जदाराने त्याची निवड करणेसाठी निवड समिती अध्यक्ष, सदस्य तसेच अधिकाऱ्यांवर प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

८. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांने दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहीती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची निवड / नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

९. सदर पदाकरिता राखीव प्रवर्गातील उमेदवार प्राप्त न झाल्यास खुल्या प्रवर्गातील उमेदवारास पुढील ११ महिन्याकरिता नियुक्ती देण्यात येईल.

१०. राष्ट्रीय आरोग्य अभियानअंतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वयाची अट ५ वर्ष शिथील राहील.

११. MBBS कोर्स पूर्ण केलेल्या डॉक्टरांना राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (NHM) काम केल्यास अनिवार्य असलेला बॉन्ड पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र DME/ Dean GMC यांच्याकडुन देण्यात येईल.

१२. उमेदवाराने नियुक्तीचे वेळी त्याच्या विरोधात कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा अथवा गंभीर न्यायालयीन प्रकरण नाही याचे Police Verification Certificate देणे बंधनकारक आहे.

१३. अर्जदाराने परिपूर्ण भरलेला अर्ज आवश्यक ती माहिती भरुन साक्षांकित केलेल्या प्रमाणपत्रासह राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम कार्यालय, ४था माळा, आरोग्य विभाग, महापालिका भवन, सरसेनानी जनरल अरुण कुमार वैद्य मार्ग चंदनवाडी, पांचपखाडी, ठाणे (प) -४०० ६०२. दूरध्वनी क्र.२५३३ १२११ /२५३३ १५९०. विस्तार क्र.४१४ या पत्यावर दि.०१/०६/२०२१ रोजी साय ५:०० वाजेपर्यंत कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत मिळतील अशा बेताने पोस्टाने / कुरियरने अथवा प्रत्यक्षात जमा करावीत. सदर तारखेनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

१४. आलेल्या उमेदवारांच्या अर्जाची छाननी करुन शैक्षणिक पात्रता, अनुभव व नियमाप्रमाणे पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील.

१५. सदरची जाहिरात www.thanecity .gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे.

सही/-

वैद्यकीय आरोग्य अधिकारी / सदस्य सचिव

इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी-टी.बी.

ठाणे महानगरपालिका, ठाणे

Scanned with CamScan

# ठाणे महानगरपालिका, ठाणे
## इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी

पदाचे नाव ................................................

फोटो

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव:- ................................................

२) पत्रव्यावहाराचा पत्ता:- ................................................

३) दुरध्वनी क्रमांक ................................................

४) ई-मेल आयडी ................................................

५) जन्म तारीख ................................................दि.३१/५/२०२१ रोजी वय ......................

६) जात ..................

७) शैक्षणिक अहर्ता

| शैक्षणिक अहर्ता | उत्तीर्ण वर्ष | बोर्ड | एकुण प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १० वी | | | | |
| १२ वी | | | | |
| पदवीका | | | | |
| पदवी | | | | |

८) अतिरीक्त शैक्षणिक अहर्ता

| अतिरीक्तशैक्षणिक अहर्ता | उत्तीर्ण वर्ष | एकुण प्राप्त गुण | टक्केवारी / ग्रेड |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

९) अनुभव

| संस्थेचे नाव | नोवरीचा कालावधी | एकुण वर्ष |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

Scanned with CamScanner

मी...........................................................................राहणार...................................................................

.................................................................................. ठाणे महानगरपालिकेत ........................ पदाकरीता अर्ज करत

असुन मी वरीलप्रमाणे नमुद केलेली माहिती सत्य आहे असे प्रमाणित करतो.

उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी

Scanned with CamScan